महाराष्ट्र शासन

# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ईमेल:- chandrapur.rdc@gmail.com दुरध्वनी क्रमांक:-07172-250659

क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 667 दिनांक:- 03 जूलै,2020

**संदर्भ** :- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34 (C) 34 (M)

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897,
3. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/600 दि.17 जून, 2020
4. मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचे पत्रक्रं.कावि/नपब्र/साप्रवि/2020/741 दि. 29 जून,2020
5. उपविभागीय अधिकारी ,ब्रम्हपुरी यांचे क्र.कावि/संकिर्ण/कोव्हिड-19/2020/170 दि. 30.06.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/645 दि. 30 जून,2020
7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/653 दि. 30 जून,2020
8. उपविभागीय अधिकारी ,ब्रम्हपुरी यांचे क्र.संकिर्ण/कोव्हिड-19/2020/179 दि. 03.07.2020

## -: आदेश :-

### फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये मनाई आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यांतर्गत कोरोना विषाणुचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंध कायदा, 1897 लागु करुन त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आली आहे व त्याकरिता अधिसुचना व नियमावली निर्गमित करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी संदर्भिय क्रमांक 05 वरील प्राप्त प्रस्ताव अन्वये कोरोणा विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव ब्रम्हपुरी शहरातील इतर भागात पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याने व त्यावर तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक असल्याने व अशी उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 144 खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस, व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशून आदेश काढणे व ब्रम्हपुरी शहर पुर्णत: बंद करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाल्याने या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 07 वरील आदेशान्वये दिनांक 01.07.2020 ते दिनांक 03.07.2020 पावेतो फक्त ब्रम्हपूरी शहर हद्दीत प्रतिबंध आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहे.

आणि ज्या अर्थी महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेशाचे अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 06 वरील आदेशान्वये, संपुर्ण चंद्रपूर जिल्हयात कोरोना विषाणुचा वाढता प्रकोप लक्षात घेता दिनांक 01.07.2020 ते दिनांक 31.07.2020 पावेतो मनाई आदेश लागु करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी **मी. डॉ. कुणाल खेमनार, जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर** फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) चे कलम 144 नुसार मला प्राप्त अधिकारान्वये असे आदेश जाहीर करतो की, ब्रम्हपुरी शहर हद्दित मोठया प्रमाणात अत्यावश्यक सेवांच्या व्यतिरिक्त लोकांचा समुह एकत्र जमण्यास व कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी संपुर्ण ब्रम्हपुरी शहरात घेण्यात येणारे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मीक, क्रीडा विषयक प्रदर्शने व शिबीरे, सभा, मेळावे, जत्रा, यात्रा, रॅली, धरणे आंदोलन, इत्यादी कार्यक्रमास मनाई करण्यात येत आहे. तसेच जनतेसही अत्यावश्यक सेवा वगळता एकत्र जमण्यास मज्जाव करण्यात येत आहे. तसेच संबधीत विभागाकडून मोठया प्रमाणात लोक एकत्र येतील अशा कोणत्याही कार्यास परवानगी देण्यात येऊ नये तसेच **या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 7 वरील आदेशाचे अनुषंगाने खालील सुचनांसह सदरचा प्रतिबंधात्मक/मनाई आदेश ब्रम्हपुरी शहर हद्दीत दिनांक 04.07.2020 चे 00.01 ते 14.07.2020 चे 24.00** या कालावधीकरीता लागु करीत आहे :-

1) **जीवनावश्यक असलेल्या पुढील बाबीं खालील प्रमाणे ठरविलेल्या वेळेत सुरू राहतील :-**

i) अत्यावश्यक किराणा सामान, भाजीपाला, जीवनावश्यक खाद्य पदार्थ, दुध, दुग्धजन्य पदार्थ अंडी, मांस, मासे, बेकरी, इ. दुकाने/आस्थापना सोमवार ते शनिवार रोजी **सकाळी 09.00 ते दु. 01.00 वाजेपावेतो सुरु राहतील. सदर दुकाने/आस्थापना रविवारी पुर्णत: बंद राहतील.**

ii) किमान मनुष्यबळासह बँका/एटीएम, कॅश लॉजिस्टीक आणि कॅश ट्रॉन्झक्शन व अन्य संबधीत सेवा. **सोमवार ते शनिवार रोजी सकाळी 09.00 ते दु. 01.00 वाजेपावेतो सुरु राहतील. व रविवारी पुर्णत: बंद राहतील.**

iii) रुग्णालये, औषधालय, औषधांचे दुकाने, विक्रेते आणि वाहतुक.( 24X7)

iv) पेट्रोल पंप, एलपीजी गॅस, यांचे वितरण, विक्री, साठवणुक व त्यांच्याशी संबधित वाहतुक. ( 24X7)

v) **खते, किटकनाशके व बी-बियाणे यांचेशी निगडीत आस्थापना/दुकाने सोमवार ते शनिवार रोजी सकाळी 09.00 ते दु. 01.00 वाजेपावेतो सुरु राहतील. सदर दुकाने/आस्थापना रविवारी पुर्णत: बंद राहतील.**

vi) शेतकरी व शेत मजुर यांचे कडून करण्यात येणारी शेती विषयक कामे, औजारे/यंत्र विक्री व दुरुस्ती संबधीत मान्यताप्राप्त दुकाने / आस्थापना (किमान मनुष्यबळासह). **सोमवार ते शनिवार रोजी सकाळी 09.00 ते दु. 01.00 वाजेपावेतो सुरु राहतील. सदर दुकाने/आस्थापना रविवारी पुर्णत: बंद राहतील.**

vii) अंत्यविधीकरिता सामाजिक अंतर राखुन 20 लोकांचे उपस्थितीस परवानगी राहील.

viii) परिसरात नगर परिषद कडून करण्यात येणारी स्वच्छता विषयक कामास परवानगी राहील.

ix) ब्रम्हपुरी शहरातील सर्व शैक्षणिक संस्था/शाळा/कॉलेज पुर्णत: बंद राहतील.

x) ब्रम्हपुरी हद्दितील सर्व शासकीय कार्यालये 100 टक्के कर्मचारी/अधिकारी यांचे उपस्थितीत सुरु राहतील. परंतु कोरोना-19 सबंधाने राज्य शासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करणे व कर्मचारी यांना कार्यालयात जातांना कार्यालयाचे ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.

xi) **अत्यावश्यक सेवेतील शासकीय कर्मचारी/अधिकारी व संबधीत व्यक्ती यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या हालचालीस सायं. 05.00 ते सकाळी 07.00 या वेळेत प्रतिबंध राहील.**

उपरोक्त वरील प्रमाणे नमुद जिवनाश्यक वस्तु/विक्री व वितरण इ. आस्थापना/दुकाने **या व्यतिरिक्त** इतर सर्व प्रकारची **आस्थापना / दुकाने दिनांक** 04.07.2020 **ते** 14.07.2020 **पर्यंत पुर्ण वेळ बंद राहतील.**

उपरोक्त प्रमाणे परवानगी देण्यात आलेली दुकाने/ आस्थापना/ प्रतिष्ठाने येथे कार्यरत कामगारांस/कर्मचारी तसेच सुविधेचे लाभ घेणारे शहरातील सर्व नागरिक यांनी कायम मास्कचा वापर करणे व सामाजिक अंतर ( Social distancing ) ठेवणे बंधनकारक राहील.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 271 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश ब्रम्हपुरी नगर परिषद हद्दीत **दिनांक** 04.07.2020 **चे** 00.01 **ते दिनांक** 14.07.2020 **चे** 00.24 या कालावधीकरिता लागू राहतील.

सदरचा आदेश आज **दिनांक 03 जुलै, 2020** रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करीत आहे.

(डॉ. कुणाल खेमनार)
**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस तथा योग्य कार्यवाहीस्तव**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपुर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपुर
3. जिल्हा आरोग्य अधिकारी , जि.प. चंद्रपुर
4. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपुर
5. उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी
6. उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपुरी

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

1. तहसिलदार, ब्रम्हपुरी यांना शहरातील संपुर्ण परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आवश्यक ती कार्यवाही करणेस्तव अग्रेषित.
2. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी यांना आवश्यक कार्यवाही करणेस्तव अग्रेषित.
3. गट विकास अधिकारी, ब्रम्हपुरी / नागभिड यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
4. मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
5. वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस
6. तालुका आरोग्य अधिकारी, ब्रम्हपुरी यांना आवश्यक आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**